# भूमी अभिलेख विभागा विषयी माहिती

भूमी अभिलेखाचे संधारण जतन व अद्यावतीकरण करणे हे प्रामुख्याने विभागाचे काम आहे. जमिनींची मोजणी करणे व शहरी भागातील नगरभूमापन झालेल्या शहरांचे / गावांचे मिळकतींचे अधिकार अभिलेख संधारण व अद्यावतीकरण करणेचे काम भूमी अभिलेख विभागाकडुन केले जाते. जमिन एकत्रिकरण योजना ही विभागा मार्फत राबविणेत येते.

या विभागामध्ये मुख्यत्वे करुन मोजणीची कामे जसे हद्दकायम मोजणी, पोटहिस्सा मोजणी, भूमी संपादन मोजणी, बिनशेती मोजणी ,कोर्टवाटप मोजणी, व कोर्ट कमीशन मोजणीची कामे केली जातात, तसेच अभिलेख दुरूस्तीचे कामे जसे कमी जास्त पत्रके व आकारफोड तयार करणेची कामे केली जातात. जमिनीचे तुकडे पाडणेस प्रतिबंध व एकत्रिकरणाची कामे, गावठाण भूमापन, शहरभूमापन, आणि संधारण इ. महत्वाची लोकपयोगी कामे केली जातात.

भूमी अभिलेखाच्या प्रमाणीत नकला मागणी अर्जानुसार विहीत नक्कल फी भरुन संबंधीतांना पुरविणे हे एक महत्वाचे काम विभागा मार्फत केले जाते.

जमिन मोजणीसाठी संबंधीत तालुक्याचे तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, यांचे कडे मोजणी अर्ज करणे आवश्यक आहे.

भूकरमापक यांनी केलेली मोजणी मान्य नसल्यास त्या विरुध्द अपिल (निमताना) तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, यांचे कडे करता येते, त्यासाठी अर्ज व निमताना मोजणी फी संबंधीत तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, कार्यालया मार्फत शासकीय कोषागारात भरणे आवश्यक असते.

तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, यांची निमताना मोजणी मान्य नसल्यास त्यावर दुसरे अपिल अधीक्षक भूमी अभिलेख यांचे कडे करता येते. त्यासाठी अर्ज व सुपर निमताना मोजणी फी संबंधीत अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालया मार्फत शासकीय कोषागारात भरणे आवश्यक असते.